# नव्या बदलांचे दर्शन !



(पान १ वरून) मागे राहता कामा नये- असे त्या म्हणाल्या.

'वारसा वंदना' या विषयावर बोलताना महाराष्ट्र महिला परिषदेच्या भारती शर्मा यांनी गुलामगिरीच्या विरोधात बंड केलेला स्पार्टाकस, अमेरिकेच्या जॉर्ज वॉशिंग्टन यांनी जगाला दिलेला लोकशाही जाहीरनामा, फ्रेंच राज्यक्रांतीने राजेशाही उलथून सर्वांना अन्न, वस्त्र व निवारा मिळेल आणि प्रगती साधता येईल, अशी समाजवादी रचना यावी यासाठी रचलेला पाया, याविषयी माहिती दिली. या घटनांनी संपूर्ण जगालाच अधिकाधिक मानवतापूर्ण व्यवहाराकडे नेले, असे त्या म्हणाल्या.

'राजसत्तेतील महिलांची कमाई' या सत्रात एक जिल्हा परिषद अध्यक्षा, दोन पंचायत समितीच्या अध्यक्षा, सहा सरपंच महिला आणि तीन ग्रामपंचायतीतील सदस्य महिला यांनी त्यांची मनोगते व्यक्त केली. लोकप्रतिनिधी म्हणून काम करतानाचे त्यांचे अनुभव त्या मनापासून मांडत होत्या. बचतगट, पाणीप्रश्न, नळयोजना, दारूबंदीचे प्रयत्न इत्यादी विविध गोष्टींबाबत बोलत होत्या. हे बोलत असतानाच त्यांना त्यांच्या कुटुंबातून मिळणारा पाठिंबा किंवा विरोध याबाबतही भाष्य करत होत्या. 'बाई' सरपंच झाली म्हणून ग्रामसभेत येऊन टवाळखोरी करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्यापासून ते 'आता आम्ही आरक्षण नसतानाही लढू शकतो', असे आत्मविश्वासपूर्ण उद्‌गार या सत्रात ऐकायला मिळाले. नवीन आव्हानांना सामोरे जाण्याचे बळ त्या पंखात भरत आहेत, असे जाणवत होते. या सत्राच्या अध्यक्षा कुशावर्ता बेळे होत्या, तर सूत्रसंचालन रत्नमाला वैद्य यांनी केले.

या अधिवेशनातल्या बहिणाबाई चौधरी विचार मंचातर्फे 'स्त्री-शक्ती उखाणे आणि चारोळ्या संमेलन' झालं. त्या आधी मुंबईच्या 'कोरो' या संस्थेतर्फे तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील काही भागावर आधारित पथनाट्य सादर केले. या सत्राच्या अध्यक्षा स्त्री-मुक्ती संघटनेच्या ज्योती म्हापसेकर होत्या तर सूत्रसंचालन दत्ता बाळसराफ यांनी केले.

दुसऱ्या दिवशी राजकारणात सक्रिय सहभाग असलेल्या स्त्रियांची कमाई दिंडी झाली. अमरावती शहरात चार हजार महिलांची दिंडी काढण्यात आली. पारंपरिक पोशाख घालून ढोलकीच्या आणि झांजांच्या तालावर घोषणा देत जल्लोषात ही दिंडी चालली.

'आंदोलनाने केलेली कमाई' या सत्रात महिला राजसत्ता आंदोलनाने सरकारकडून ज्या मागण्या मिळवून घेतल्या त्याची माहिती दिला गेली-

★ झेंडावंदनाचा अधिकार सरपंच महिलांना असावा, असा निर्णय करून घेतला गेला.

★ ग्रामसभेत अविश्वास ठराव पूर्वी दोन-तृतीयांश मतदानाने आणता येत असे, तो आता तीन-चतुर्थांश विरोधी मतदान असल्याशिवाय मंजूर होणार नाही, अशी तरतूद करून घेण्यात आली.

★ ग्रामपंचायतीच्या एकूण अर्थसंकल्पाच्या दहा टक्के बजेट महिलांकरिता व पंधरा टक्के बजेट दलितांकरिता आहे. ते मिळवून त्याची अंमलबजावणी केली.

★ ग्रामसभेच्या आधी महिलांची ग्रामसभा व्हावी, अशी तरतूद देशात कुठेही नाही. ती महाराष्ट्रात मिळवून घेण्यात आंदोलनाला यश आले.

★ महिला सरपंच तेथे महिला ग्रामसेविका- ही प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेली गोष्ट मंजूर होऊन ३० टक्के महिला ग्रामसेविका असाव्यात, अशी तरतूद आता करण्यात आली आहे.

ज्योती म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो' या मुक्तनाट्याचा प्रयोग 'महाराष्ट्र महिला परिषद' या संघटनेतील कार्यकर्त्यांनी सादर केला.

पुरस्कार वितरण सत्रात आदर्श सरपंच म्हणून चार महिलांचा सत्कार करण्यात आला. तर आदर्श जिल्हा संघटिका म्हणून (कोकण) अनुयाताई कुलकर्णी यांना सन्मानित करण्यात आले. 'राजकारणातील स्त्रियांची पुढील लढाई' या सत्रात आंदोलनाचे राज्य निमंत्रक भीम रास्कर यांनी त्यांचे विचार व्यक्त केले. तेव्हा उपस्थित सुमारे पाच-सहा हजार महिलांमध्ये प्रेरक भावना जागवली गेली.

समारोपाच्या सत्रात एक 'वेगळा पुनर्विवाह सोहळा' करण्यात आला; तो नवरदेव 'विकासराव' (सुरेश वैद्य) व 'सत्ताराणी' (श्रीम. रत्नमाला वैद्य) यांचा. सत्ता आणि विकास यांचा हा प्रतीकात्मक विवाह सोहळा होता. सध्या सत्तेचा उपयोग लोकांचा विकास साधण्यापेक्षा इतर अनेक बाबींकरिता केला जातो. हे चित्र बदलून सत्तेत गेलेल्या लोकप्रतिनिधींनी वंचित घटकांचा आणि समाजाचा 'विकास' साधून सत्ता चालविली पाहिजे, हे सांगण्याकरिता हा प्रतीकात्मक विवाह सोहळा होता. या प्रसंगी मंगलाष्टके म्हणून संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील साहित्याचा काही अंश वाचून दाखविण्यात आला.

अधिवेशनाकरिता अर्थसाहाय्य उभे करताना प्रत्येक जिल्ह्यातून किमान पाच हजार रुपये लोक-वर्गणीतून जमा करण्यात आले. स्थानिक पातळीवर जेवण, छपाई व व्यासपीठ याकरिता देणगीदार मिळविले. ज्या महिलांना वर्गणी स्वरूपात पैसे देणे शक्य नव्हते, त्या महिलांनी शिधा (तांदूळ) बांधून आणला होता.

अधिवेशनाला राज्याच्या कानाकोपऱ्यातून महिला आल्या होत्या. कृश अंगकाठीच्या, गुडघ्यापर्यंत काचामारू साडी नेसलेल्या, कोरकू या आदिवासी महिला चिखलदऱ्यातून आल्या होत्या. मध्य प्रदेशातून बैतूल जिल्ह्यातून बचतगटात संघटित झालेल्या ४० महिला, त्यांचे संघटक गुलरेज यांच्याबरोबर आल्या होत्या. नवीन समजून घेण्याची इच्छा आणि यातले मला काय लागू आहे, असा विचार करण्याचा प्रयत्न बहुसंख्य महिला करत होत्या. नव्या बदलत्या महाराष्ट्राचे दर्शन या अधिवेशनात घडले.

लोकसत्ता

शनिवार, १८ एप्रिल २००९